आरबीआय/२०१२-१३/९०
आर.पी.सी.डी. जी.एस.एस.डी.बी.सी. क्रमांक ९/०९.०३.०१/२०१२-१३ जुलै २, २०१२

प्रति,

अध्यक्ष/प्रबंध निदेशक,
भारतीय सार्वजनीक क्षेत्रातील सर्व बँका,
(विभागीय ग्रामीण बँका वगळून)

महोदय,

**शेष सर्व स्कॅव्हेंजर्स (मल स्वच्छ करणारे) व त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांच्या पुनर्वसनासाठी, सामाजिक न्याय व प्राधिकारदायी मंत्रालयाकडून, मॅन्युअल स्कॅव्हेंजर्सच्या पुनर्वसनासाठी स्वयं रोजगार योजनेवरील महापरिपत्रक (स्कॅव्हेंजर्सची मुक्तता व पुनर्वसन ह्यासाठी योजना).**

मानवी सफाई कामगारांच्या पुनर्वसनासाठी नवी स्वयंरोजगार योजना (एस.आर.एम.एस.) योजना राबवण्यासाठी रिझर्व बॅकेने एप्रिल २००८ मध्ये सूचना जारी केल्या होत्या. बँकांना या विषयावरच्या अमलात असणाऱ्या सर्व सूचना एकत्र उपलब्ध व्हाव्यात यासाठी या विषयाची मार्गदर्शक तत्वे/सूचना/आदेश व अहवालाचे स्वरुप तयार केले आहे व त्याची सूची जोडली आहे. हे मुख्य परिपत्रक ३०जुन २०११ पर्यंत अद्यतन केले आहे व तो पर्यंतच्या सर्व सूचना या परिपत्रकात एकत्र आल्या आहेत. योजनेचा तपशील व बँकांनी अंमलात आणण्याची मार्गदर्शक तत्वे या परिपत्रकाच्या सूची १ मध्ये दिली आहेत. या योजनेचे कामकाज व बँकांनी ही योजना राबवताना पाळायची ढोबळ मार्गदर्शक तत्वे सूची २ व ३ मध्ये दिली आहे. २००५-०६ पासून भारत सरकारने सध्याची सफाई कामगारांची मुक्तता व पुनर्वसन यासाठीची राष्ट्रीय योजनेला (एन.एस.एल.आर.एस.) पैसे पुरवणे बंद केले आहे. त्यामुळे या योजने ऐवजी आपण एस.आर.एम.एस. योजना अमलात आणावी असा आदेश दिला जात आहे.

२. कृपया पोच द्यावी.

आपला नम्र,

(सी.डी. श्रिनिवासन्),
मुख्य महाव्यवस्थापक

सहपत्र :- वरील प्रमाणे + जोडपत्र १ ते ४

ग्रामीण योजना व पतविभाग, मध्यवर्ती कार्यालय, १० वा मजला, मध्यवर्ती कार्यालय इमारत, शहिद भगत सिंग मार्ग, पोस्ट बॉक्स नं. १००१४, मुंबईः ४०० ००१, फोनः २२६०१०००, फॅक्स २२६१०९४३/२२६१०९४८ ई-मेल :cgmincrpcd@rbi.org.in

**सूची १**

## मानवी सफाई कामगारांच्या पुनर्वसनासाठी स्वयंरोजगार योजना (एस.आर.एम.एस.)

### १. परिचय

१.१ आपणास माहितच आहे की, सर्व मेहतरांना व त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांना त्यांच्या विद्यमान व वंशपारंपरिक अशा, घाण हलविण्याच्या दुर्गंधयुक्त व्यवसायापासून मुक्त करून, त्यांना मानाचे व पर्यायी उद्योग व्यवसाय, पाच वर्षांच्या आत उपलब्ध करून देण्यासाठी, १९९३ पासून, सार्वजनिक क्षेत्रातील सर्व बँकांद्वारे, नॅशनल स्कीम फॉर लिबरेशन अँड रिहॅबिलीटेशन ऑफ स्कॅव्हेंजर्स(एनएसएलआरएस)राबविण्यात येत आहे. भारत सरकारने, २००५-०६ पासून विद्यमान एनएसएलआरएस ला अर्थ सहाय्य करणे थांबविले असून मार्च २००९ पासून उर्वरित मेहेतर व त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांचे पुनर्वसन करण्यासाठी, सेल्फ एंप्लॉयमेंट ऑफ मॅन्युअल स्कॅव्हेंजर्स योजना(एसआरएमएस)ला मंजुरी दिली आहे. भार्त सरकारच्या, सामाजिक न्याय व अधिकार दान मंत्रालयाने, **ही योजना सप्टेंबर ३०, २००९ नंतरही सुरु ठेवण्याचे ठरविले असल्याने, ह्या योजनेची अंमलबजावणी डिसेंबर ३१, २००९ पर्यंत पूर्ण करण्यास व अपरिहार्य प्रकरणातील त्रुटी, मार्च ३१, २०१० पर्यंत पूर्ण करण्यास बँकांना सांगण्यात आले होते** (परिपत्रक क्रमांक आर.पी.सी.डी.एस.पी.बी.सी. क्र. ४७/०९.०३.०१/२००९-१० दिनांक १८ डिसेंबर २००९ अन्वये). ह्या मंजुरीप्राप्त योजनेमध्ये, हातांनी घाण काढणारांसाठी, भांडवल-सहाय्य(सबसिडी), सवलतीयुक्त कर्जे व त्यांच्या पुनर्वसनासाठी असलेल्या पर्यायी व्यवसायांमध्ये क्षमता-निर्माण करणे इत्यादींची तरतुद केली आहे. ह्याशिवाय, भारत सरकारची तीव्र इच्छा आहे की ह्या योजनेची अंमलबजावणी करण्यामधील कोणत्याही आडचणींवर मात करण्यासाठी, निर्धाराच्या भावनेने ही योजना एक राष्ट्रीय प्राधान्य म्हणून राबविली जावी.

१.२ या योजनेचे यश सार्वजनिक बँकांनी सर्व पातळीवर या योजनेचे परिणामकारक भाग घेणे व योजनेवर देखरेख करणे यावर अवलंबून आहे. ही योजना ठरावीक काळात अमलात आणायची आहे व त्यासाठी सफाई कामगार व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती ओळखून काढून पर्यायी उद्योगासाठी त्यांचा कल ओळखणे हे कार्य डिसेंबर २००९ पर्यंत करायचे आहे. आणि मार्च ३१ २०१० पर्यंतच्या केसेस.

१.३ राज्यातील पर्यवेक्षणानुसार भारतात सफाई कामगार व त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांची एकूण संख्या ७,७०,३३८ इतकी आहे. एन.एस.एल.आर.एस. खाली आधीच ४,२७,८७० सफाई कामगारांना मदत केली गेली आहे. त्यामुळे आता एकूण पुनर्वसन करण्याच्या सफाई कामगारांची संख्या ३,४२,४८६ इतकी येते. त्याची राज्यवार तपशील सूची १ मध्ये दिला आहे. त्यासाठी आवश्यक असलेल्या पैशांचा तपशील सूची २ मध्ये दिला आहे.

### योजनेचे उद्दिष्ट

ज्या उर्वरीत सफाई कामगारांना अद्याप पुनर्वसनासाठी मदत मिळाली नाही त्यांना सप्टेंबर २००९ पर्यंत मदत करणे.

### पात्रता

ज्या सफाई कामगारांना व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना त्यांचे उत्पन्न कितीही असले तरी अद्याप राज्य/केंद्र सरकारच्या योजनेखाली पुनर्वसनासाठी मदत मिळाली नाही ते या योजनेखाली मदतीस पात्र आहेत.

**सफाई कामगाराची व्याख्या**

'सफाई कामगार' म्हणजे जी व्यक्ती मानवी घाण मानवी पद्धतीने काढण्याच्या अमानवी व घृणास्पद कामात पूर्णतः किंवा अंशतः गुंतली आहे. त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती म्हणजे जी व्यक्ती त्यांच्यावर अवलंबून आहे किंवा त्यांच्या कुटुंबात आहे अशी व्यक्ती, मग ती या उद्योगात गुंतली असे वा नसो. प्रत्येक सफाई कामगार व त्याचा बेरोजगार असा १८ वर्षाचा मुलगा/मुलगी शोधून काढून त्यांचे पुनर्वसन केले जाईल.

**२. योजनेचा तपशील**

२.१ मानवी सफाई कामगाराची स्वयंरोजगार योजना सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना लागू आहे.

२.२ सामाजिक न्याय व अधिकारप्रदान मंत्रालयाच्या जोडपत्र ३ मध्ये दिलेल्या मुख्य संस्थांच्या माध्यमातून ह्या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. बँकांकडून कर्ज मिळविण्यासाठी पात्र असलेले लाभार्थी राज्यस्तरीय चॅनलायझिंग एजन्सीमार्फत प्रायोजित केले जातील. ह्या योजनेच्या एकूण व्याप्तीमध्ये, ह्या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी स्वयंसेवा गटांचा (एसएचजी) अंतर्भाव केला जाऊ शकतो. ही एक कालबध्द योजना असल्यामुळे, इतर योजनांसाठी एसएचजींना लागु असणारे निकष ह्या योजनेसाठी लागु होणार नाहीत.

२.३ शोधून काढलेल्या सफाई कामगारांना प्रशिक्षण, कर्ज व मदत पुरवली जाईल. फक्त राज्य संस्थांनी पुरस्कृत केलेल्या उमेदवारांनाच बँका कर्ज देतील. कर्ज मान्य झाल्यानंतर बँका राज्य संस्थांकडून भांडवली मदत मागतील. या संस्था ती मदत देतील व लाभार्थाला मदत व कर्ज दोन्ही दिले जाईल. लाभार्थीला कर्ज दिल्यानंतर बँका दर तिमाहीला राज्य यंत्रणांकडून व्याजासाठी मदत मागेल.

२.४ बँका लाभार्थींना पत पुरवठा करतील व या योजनेखाली दिलेल्या दराने व्याजाची आकारणे करतील. बँकांनी आकारण्याचे व्याज लाभार्थीकडून घेण्याचे व्याज ह्यातील फरक हा राष्ट्रीय सफाई कामगार वित्त व विकास महामंडळ (एन.एस.के.एफ.डी.सी.) किंवा शिखरस्थ पातळीवरील अधिकृत संस्था त्यांच्या राज्यसंस्थेमार्फत देईल. परंतु व्याज व भांडवली मदत यांचे दावे करण्याच्या पद्धती सूचक अशा आहेत. संबंधीत राज्य सरकार व एस.एल.बी.सी. हे योजनेची सुरळीत अंमलबजावणी होण्यासाठी पर्यायी पद्धती तयार करु शकतील.

**३. अर्थसहाय्य**

३.१ या योजनेखाली प्रकल्पाची किंमत रुपये ५.०० लाखांपर्यंत असू शकते. प्रकल्पाची उरलेली किंमतपात्र अशी भांडवली मदत वजा करुन कर्जरुपाने दिली जाईल. या योजनेखाली मार्जिन मनी / प्रकल्प राबवणाऱ्याचा हिस्सा आणण्याची गरज नाही.

३.२ या योजनेखाली सूक्ष्म वित्तसहाय्य जास्तीत जास्त रुपये २५,०००/-पर्यंत व मुदत कर्ज (जास्तीत जास्त रुपये ५ लाख पर्यंत) मंजूर होऊ शकते. सूक्ष्म वित्तसहाय्य हे स्वयंमदत गट(एस.एच.जी.एस) व प्रसिद्ध गैरशासकीय(एन.जी.ओ) संस्थांमार्फत होऊ शकते.

३.३ लाभार्थींना आकारायचा व्याजदर खालीलप्रमाणे :-

| | |
|---|---|
| अ) रुपये २५०००/- च्या पर्यंत प्रकल्पांसाठी | दरवर्षी ४%<br>(महिलांसाठी) ५% |

| | |
|---|---|
| ब) रुपये २५०००/- च्या वरील प्रकल्पांसाठी | दरवर्षी ६% |

३.४ जर बँकेने आकारलेले दर या योजनेतील दरांपेक्षा जास्त असतील तर फरकाची व्याज मदत बँकांना दिली जाईल व त्याची व्यवस्था एन.एस.के.एफ.डी.सी. / मंत्रालयाने मान्य केलेली अन्य संस्था करील.

३.५ प्रत्येक राज्यात प्रत्येक बँकेसाठी वार्षिक उद्दिष्ट राज्या राज्याच्या योजनेनुसार राज्य स्तरीय बँकर्स समिती(एस.एल.बी.सी) ठरवील.

## ४. परतफेड

रुपये २५,०००/- पर्यंतच्या प्रकल्पाची परतफेडीची मुदत ३ वर्षे व त्यापेक्षा जास्त रकमेच्या परतफेडीची मुदत ४ वर्षे असेल. सवलतीचा कालखंड ६ महिने असेल. राज्यसंस्था (एस.सी.ए.) ३ महिन्यात लाभार्थींना पैसे देईल.

## ५. मदत

५.१ लाभार्थींना त्यांच्या पतीशी संबंधित अशी भांडवली मदत टप्प्याटप्प्याने दिली जाईल.

| | |
|---|---|
| अ) रुपये २५,०००/- पर्यंतच्या प्रकल्पांना | प्रकल्पाच्या किमतीच्या ५०% |
| ब) रुपये २५,०००/- पेक्षा जास्त किमतीच्या प्रकल्पांना | प्रकल्पाच्या किमतीच्या २५% (कमीत कमी १२,५०००/- व जास्तीत जास्त रु. २०,०००/-) |

५.२ या योजनेखाली आवश्यक असल्यास दुसरी आणि त्यानंतरही आणखी कर्जे घेऊ शकतील. मात्र त्यासाठी भांडवली मदत व व्याज मदत मिळणार नाही.

## ६. अंमलबजावणी करणाऱ्या संस्था

६.१ या योजनेखाली राष्ट्रीय सफाई कामगार वित्त व विकास महामंडळ (एन.एस.के.एफ.डी.सी.) किंवा इतर यंत्रणा सर्व कार्य करतील व लाभार्थींना योग्य फायदे मिळावेत म्हणून इतर संस्थांबरोबर समन्वय साधतील. एन.एस.के.एफ.डी.सी. किंवा इतर मान्यता प्राप्त संस्थांनी स्वतःच्या पैशातुन या योजनांसाठी प्रथम खर्च करुन करायला मुभा आहे व त्यानंतर त्याची भरपई त्यांना मिळेल. एन.एस.के.एफ.डी.सी. किंवा इतर मान्यताप्राप्त संस्थांना स्वतःच्या पैशातून लाभार्थींना योजनेतील मान्यताप्राप्त व्याजदराने कर्जे देणे व त्यांच्याकडून वसूल करणे हा पर्याय उपलब्ध आहे. परंतु सरकारकडून या रकमांची भरपाई मिळणार नाही. अशा परिस्थितीमध्ये ते प्रशिक्षणासाठी मदत, व्याज सवलत, भांडवली सवलत इत्यादी मागू शकतात.

६.२ ही योजना राष्ट्रीय स्तरावर एन.एस.के.एफ.डी.सी. किंवा इतर मान्यताप्राप्त संस्थांच्या मार्फत राबवण्याचा प्रस्ताव आहे. राज्य स्तरीय पातळीवर अंमलबजावणी करणाऱ्या संस्था राज्य संस्थांचे काम करतील. यामध्ये सरकारि संस्था व नामांकित सूक्ष्म वित्त संस्था व गैरसरकारी संस्थांच्या एनजीओ सहभागासाठी प्रोत्साहन देण्यात येईल. लाभार्थींना प्रशिक्षण देण्यासाठी शासकीय प्रशिक्षण संस्थांबरोबरच नामांकित खास प्रशिक्षण संस्थांनाही सहभागी करुन घेण्यात येईल.

६.३ एन.एस.के.एफ.डी.सी. व राज्यसंस्था या सध्या मंत्रालयाच्या अखत्यारीतील संस्थांना प्रस्तावीत योजनेची अंमलबजावणी करण्याचा अनुभव आहे. परंतु त्यांची सध्या मर्यादीत असलेली पायाभुत सुविधा क्षमता वाढविणे आवश्यक आहे. या संस्थांकडे सध्या असलेल्या कामांबरोबरच त्यांना या योजनेची अंमलबजावणी करायची आहे व त्यामुळे वाढलेल्या कामाचा बोजा सांभाळण्याची त्यांची क्षमता वाढवणे व त्यांच्यावर सोपवलेले काम करण्यासाठी नवीन मार्ग अवलंबणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे

निरनिराळ्या पातळीवरील इतर निवडक संस्थांना पाठिंबा देण्याची आवश्यकता आहे. योजना राबवणाऱ्या निरनिराळ्या पातळीवरील संस्थांना पाठिंबा देण्यासाठी रुपये ५ कोटीचा सहायता निधी राखून ठेवला आहे.

६.४ या योजनेच्या अंमलबजावणीच्या प्रगतीचे एन.एस.के.एफ.डी.सी. तसेच या कार्यासाठी ठरवलेल्या इतर संस्थांमार्फत देखरेख केली जाईल. सफाई कामगारांचा राष्ट्रीय आयोग त्यांच्या नियमानुसार सफाई कामगारांच्या सामाजिक व आर्थिक पुनर्वसनाच्या योजनांची अंमलबजावणी कशी चालु आहे याचा आढावा घेईल. त्याचवेळी या योजनेचे मूल्यमापन एखाद्या स्वतंत्र यंत्रणेकडून केले जाईल. यासाठी योजनेच्या एकूण किमतीच्या १% (रुपये ७.३५ कोटी) रुपये राखून ठेवला आहे.

**७. बँकांची भुमिका**

७.१ या योजनेकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा उद्दिष्टाकडे पहाण्याचा नसून रोजगार व मिळकत हा असावा. या योजनेचे यश सर्व पातळीवरील बँकांनी परिणामकारक भाग घेणे व देखरेख करणे यावर अवलंबून आहे. या गोष्टीकडे बँकांनी विशेष लक्ष द्यावे व बँकेच्या पुरेशा शाखा या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये भाग घेत आहेत तसेच राज्य स्तरीय स्थानिक अनुसूचित जाती व जमाती विकास व अर्थ महामंडळ यात भाग घेत आहे याकडे लक्ष द्यावे. बँकांनी लाभार्थींना लाभ देण्याचे उद्दीष्टांची या योजनेच्या जिल्हानिहाय (डीसीपी) वाटणी वार्षिक पत योजनेखाली (एसीपी)वाटणी करुन तसेच जिल्हा पत योजनेखाली वाटणी करुन करावी. ही वाटणी त्या त्या शाखेच्या कामाच्या क्षेत्राखाली असलेल्या लायक लाभार्थींच्या उपलब्धतेनुसार करावी. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी बँका त्यांच्या शाखांना/नियंत्रक कार्यालयांना योजनेच्या अंमलबजावणीसाठी योग्य त्या सूचना देईल.

७.२ या योजनेत अपेक्षित नसलेली कागदपत्रे म्हणजे हमीपत्रे इत्यादी बँकांच्या शाखा मागत नाहीत व अर्जदारांना सर्व सहकार्य देतील याची बँकांनी खात्री करावी.

७.३ बँकांनी लाभार्थीकडून मुदत ठेवी रक्कम ठेवण्याची सक्ती करु नये.

७.४ बँकांनी अर्जाचा निकाल वेळेवर लावावा व लाभार्थी व बँकांमध्ये काम करणारे दलाल येऊ नयेत म्हणून सोप्या व पारदर्शक पद्धती अमलात आणाव्या.

७.५ रुपये २५,०००/- पर्यंतच्या पतमर्यादेचे अर्ज १५ दिवसात निकालात काढावेत व २५,०००/- वरील अर्ज ८ ते ९ आठवड्यात निकालात काढावेत.

७.६ अर्ज आल्याचे व निकालात काढल्याचे योग्य ते रेकॉर्ड ठेवावेत.

७.७ अनुसूचित जाती जमातीचे अर्ज वगळून इतरांचे अर्ज शाखाप्रमुख नाकारु शकतात मात्र या अर्ज नाकारण्याच्या बाबी विभागीय प्रबंधकांनी पडताळून पहाव्यात. किरकोळ कारणासाठी अर्ज नाकारु नयेत. अर्ज नाकारल्यास अर्ज नाकारण्याचे कारण नमूद करुन ठेवावे.

७.८ ठरलेल्या कालावधी नंतर प्रलंबित असलेले अर्ज प्राधान्य क्रमाने निकालात काढावेत.

७.९ या योजनेखाली बँकांच्या कामगिरीचा वेळोवेळी लीड बँक योजना, एस.एल.बी.सी. बैठक यावेळी आढावा घ्यावा.

७.१० लाभार्थींना कर्जपुरवठा करण्यासाठी बँकांच्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण द्यावे व त्यांचा दृष्टीकोन बदलण्याचे प्रयत्न करावेत.

७.११ उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी बँकांनी मान्यतापूर्व छाननी सुधारावी व कर्ज वाटप केल्या नंतरचा पाठपुरवठा कसून करावा.

७.१२ योजना राबवताना अनेक महत्वाच्या गोष्टींवर महत्वाचे निर्णय वेळोवेळी घ्यावे लागतील. महत्वाच्या बाबीवर वेळेवर निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी वेळोवेळी व्हावी यासाठी खास यंत्रणा उभारली जाईल. सामाजिक न्याय व या खात्याच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली यासाठी एक सक्षमीकरण समितीचे गठन केले आहे. त्या समितीत खालील सभासद असतील.

- सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव - सदस्य.
- सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाचे सहसचिव व आर्थिक सल्लागार - सदस्य.
- योजना आयोगातील संबंधित सल्लागार - सदस्य.
- सहसचिव अनुसूचित जाति विकास - निमंत्रक.

या समितीच्या बैठकीसाठी आवश्यकता असल्यास खास निमंत्रित व्यक्ती बोलावण्यात येतील. या योजनेच्या सर्वसाधारण संविधानामध्ये राहून ही समिती सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्र्यांच्या संमती नंतर या शिफारसींची अंमलबजावणी करतील.

## ८. प्रकल्पांचे प्रकार

८.१ लाभार्थी कोणाताही उत्पन्न निर्माण करणारा प्रकल्प निवडू शकतात. खाली अशा प्रकल्पांची यादी दिली आहे की जे सर्व साधारणपणे नियमित उत्पन्न देतात व लाभार्थी यांची निवड करतात.

| | **प्रकल्प** | **प्रकल्पातील अंदाजे गुंतवणुक** |
|---|---|---|
| १ | फळे, भाज्या, मांस यांची दुकाने, पानाची दुकाने, घड्याळे दुरुस्तीचे दुकान, चक्की इत्यादी | रुपये २५,०००/- पर्यंत |
| २ | केशकर्तनालय, शिंप्याचे दुकान, पिठाची चक्की, सायकल भाड्याने देणे व दुरुस्ती दुकान, एस.टी.डी./पी.सी.ओ. बूथ इत्यादी | रुपये २५००१/- ते रुपये ५०,०००/- प्रत्येकी |
| ३ | (पेट्रोलवरची) ऑटोरिक्षा, ऑटोमोबाईल दुरुस्तीचे दुकान, पी.सी.ओ/झेरॉक्सचे दुकान, सामान्य किराणा व प्रोव्हिजन दुकान, ब्युटी पार्लर, म्युझिक स्टोअर इत्यादी | रुपये ५०००१/- ते रुपये १,००,०००/- |
| ४ | वाहतूक घरघुती यंत्रे व वाहणे दुरुस्ती व रंगवणे, लाँड्री व ड्रायक्लिनिंग दुकान, सॅनिटरी व हार्डवेअर दुकान, घरगुती इलेक्ट्रॉनिक वस्तू दुरुस्ती व सेवा यांचे दुकान, टेंट हाऊस, बँड पार्टी, तयार कपड्यांचे दुकान, शेती व तदनुषंगीक व्यवसाय ज्यात जमीनीचा अंतर्भाव नसलेल्या योजनांचा, जसे ट्रॅक्टर, ट्रॉली, कुक्कुटपालन इत्यादी. | रुपये १,००,००१/- ते रुपये ५,००,०००/- पर्यंत |

## ९. प्रशिक्षण

९.१ सफाई कामगारांचे अपारंपारिक व्यवसायामध्ये पुनर्वसन करण्यात येईल त्यामुळे त्यांना नवी कौशल्य व उद्यमशीलता शिकावी लागेल. नामांकित सरकारी यंत्रणा व संस्थांकडून तसेच नामांकित खास प्रशिक्षण संस्थांकडून हे प्रशिक्षण देण्यात येईल. प्रशिक्षणार्थ्यांना किफायतशीर नोकरी मिळावी यासाठी त्यांना निवडक उद्योग/व्यवसाय संघटनांबरोबर संपर्क साधण्याला प्रोत्साहन दिले जाईल. प्रशिक्षणाची किंमत प्रत्येक लाभार्थीमागे रुपये १४,०००/- इतकी असेल असे धरले आहे. यामध्ये प्रशिक्षण शुल्क, प्रशिक्षणासाठी लागणारे सामान व प्रशिक्षणार्थींना दिला जाणारा प्रशिक्षण भत्ता यांचा समावेश असेल.

९.२ सर्व पातळीवर जागृती निर्माण व्हावी व लाभार्थींना योग्य लाभ कमीत कमी वेळेत मिळावा यासाठी प्रसिद्धीचा एक सर्वसमावेशक कार्यक्रम हाती घेतला जाईल.

## १०. देखरेख आणि मूल्यांकन

सफाई कामगारांची मुक्तता व पुनर्वसन यामधील तफावत भरुन काढण्यासाठी सुक्या शौचालयाच्या परिवर्तनाची योजना गृह व नागरी गरीबी निर्मूलन मंत्रालय (एम.ओ.एच. व यू.पी.ए.) व स्थानिक/राज्यपातळीवरील संस्थांच्या सुसूत्रीकरणाने हाती घेतली जाईल. भारत सरकारची व राज्य सरकारची अनेक मंत्रालये वेगवेगळे विकासात्मक कार्यक्रम राबवत असल्यामुळे इतर अस्तित्वातील कार्यक्रमाचे लाभ या योजनेबरोबर लाभार्थींना घेता येतील याचे प्रयत्न केले जातील. या कारणासाठी मानवी सफाईचे पूर्णपणे उच्चाटन २००७ पर्यंत करण्याच्या योजनेखाली देखरेख करण्यासाठी अस्तित्वातल्या मध्यवर्ती देखरेख समितीची असलेली यंत्रणा व आंतरमंत्रालयीन प्रतिनिधीत्व याचा वापर करण्यात येईल. मानवी प्रयत्नांनी कचरा साफ केला जाणे, २००७ पर्यंत संपूर्णपणे थांबविण्यासाठी कृती योजनेच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी असलेली आणि आंतर-मंत्रीय प्रतिनिधींसह सचिवांच्या (एमएसजे अँड ई) अध्यक्षतेखाली असलेल्या केंद्रीय देखरेख समिती (सीएमसी) ची यंत्रणा ह्यासाठी वापरली जाईल.

१०.१ राष्ट्रीय, राज्य, जिल्हा व ग्रामीण आणि शहरी पातळीवरच्या अंमलबजावणी संस्था या योजनेच्या अंमलबजावणीची देखरेख व मूल्यांकन करतात की जेणे करुन कार्यक्रमांची अंमलबजावणी व ठरलेल्या उद्देशानुसार कार्यक्रमाची अंमलबजावणी होईल.

१०.२ अंमलबजावणी करणारी यंत्रणा अग्रणी अधिकाऱ्याला बँकेच्या (अग्रणी बँकेच्या शाखांच्या बाबतीत) किंवा जिल्हा समन्वयकाला (इतर बँकांच्या शाखांच्या बाबतीत) तसेच त्यांच्या नियंत्रक कार्यालयाला दर महिन्याला सूची २ नुसार एक अहवाल पाठवेल. संबंधित अग्रणी बँक अधिकारी/जिल्हा समन्वयकाने याच सूचीनुसार त्याच्या जिल्ह्यातल्या शाखेची सर्व माहिती एकत्रित करावी की जेणेकरुन योजनेच्या अंमलबजावणीची प्रत्येक जिल्ह्यातली माहिती उपलब्ध होईल. जिल्हा स्मनवयकाने ही एकत्रित माहिती अग्रणी बँक अधिकाऱ्याला पाठवावी की जेणेकरुन बँकनिहाय माहिती जिल्हा सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये आढावा घेण्यासाठी ठेवता येईल.

१०.३ बँकांच्या नियंत्रक कार्यालयाने त्यांच्या अखत्यारीतल्या सर्व शाखांच्या माहितीचे एकत्रीकरण करुन ते राज्य पातळीवरील विभागीय/जिल्हा कार्यालयाला सादर करावे. या विभागीय/जिल्हा कार्यालयाने शाखांची कामगिरी पूर्ण राज्याचा एकत्र विचार करुन विचारात घ्यावी. प्रत्येक बँकेच्या राज्य/केंद्रशासित प्रदेश पातळीवरची माहिती राज्यस्तरीय बँक पातळीवरील समितीच्या निमंत्रकाकडे पाठवावी जेणे करुन त्याचा एस.एल.बी.सी. बैठकीमध्ये विचार होऊ शकतो. या माहितीची एक प्रत रिझर्व बँकेच्या संबंधित आर.पी.सी.डी. शाखेला पाठवावी.

१०.४ बँकेच्या विभागीय/जिल्हा कार्यालयांनी राज्य/केंद्रशासित प्रदेश निहाय माहिती बँकेच्या मुख्य कार्यालयाला आढाव्यासाठी पाठवावी. या अहवालाच्या आधारे बँकांच्या मुख्य कार्यालयांनी या योजनेखाली बँकांच्या कामगिरीचा आढावा घ्यावा. बँकांच्या मुख्य कार्यालयीन कामगिरीचा राज्य/केंद्र शासित प्रदेश निहाय अहवाल ज्या महिन्यासाठीचा असेल त्या महिन्यानंतर पुढच्या महिन्याच्या शेवटपर्यंत ग्रामीण योजना व पत विभाग रिझर्व बँक ऑफ इंडिया, केन्द्रीय कार्यालय मुंबई यांना पाठवावा.

१०.५ बँकांच्या नियंत्रक/विभागीय/जिल्हानिहाय/मुख्य कार्यालयांनी तसेच त्यांच्या एस.एल.बी.सी. नियंत्रकांनी सूची २ मध्ये दिलेला नमुना वापरावा.

१०.६ या योजनेच्या सुरळीत अंमलबजावणीसाठी सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाकडून कोणतीही सूचना/स्पष्टीकरण आल्यास ते जारी करण्यात येईल.

*सूची २*

**सफाई कामगारांच्या पुनर्वसनासाठी स्वयंरोजगार योजनेचा संकलीत मासिक अहवाल महिना.**

(बँकांनी रिझर्व बँकेला देण्याचा)

*(प्रत्यक्ष संख्या आकड्यात)*
*(रक्कम लक्ष रुपयात)*

| अनु. क्र. | राज्याचे/केंद्रशासित प्रदेशाचे नाव | उद्दिष्ट | आलेले अर्ज | | | | मंजूर झालेले कर्ज | | | | | दिलेले कर्ज | | | | | नामंजुर झालेले अर्ज | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्वीच्या महिन्यापर्यंत | | चालू महिन्यात | | पूर्वीच्या महिन्यापर्यंत | | चालू महिन्यात | | मान्य असलेली भांडवली मदत स्तंभ ११ प्रमाणे | पूर्वीच्या महिन्यापर्यंत | | चालू महिन्यात | | दिलेली मदत स्तंभ १६ प्रमाणे | पूर्वीच्या महिन्यापर्यंत | | चालू महिन्यात | |
| | | | क्र. | रु. | क्र. | रु. | क्र. | रु. | क्र. | रु. | रु. | क्र. | रु. | क्र. | रु. | | क्र. | रु. | क्र. | रु. |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ |
| १ | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ७ | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ८ | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ९ | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १० | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ११ | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १२ | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १३ | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १४ | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १५ | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १६ | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १७ | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १८ | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १९ | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २० | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २१ | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २२ | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २३ | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

**सूची ३**

## सफाई कामगारांच्या पुनर्वसनाची योजना (एम.आर.एम.एस.)

एम.आर.एम.एस. योजनेखाली स्प्टेंबर/मार्चला संपलेल्या अर्धवर्ष वसुलीची परिस्थिती.

बँकेचे नाव -

राज्याचे/केंद्रशासित प्रदेशाचे नाव -

(रक्कम लक्ष रुपयात)

| | मागाणी | वसूली | थकित कर्जे | मागणे व वसूलीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| आंध्रप्रदेश | | | | |
| आसाम | | | | |
| बिहार | | | | |
| गुजरात | | | | |
| हरियाणा | | | | |
| हिमाचल प्रदेश | | | | |
| जम्मु आणि काश्मिर | | | | |
| कर्नाटक | | | | |
| केरळ | | | | |
| मध्य प्रदेश | | | | |
| महाराष्ट्र | | | | |
| मणिपुर | | | | |
| मेघालय | | | | |
| नागालँड | | | | |
| ओरिसा | | | | |
| पंजाब | | | | |
| राजस्थान | | | | |
| सिक्कीम | | | | |
| तमिळनाडू | | | | |
| त्रिपुरा | | | | |
| उत्तरप्रदेश | | | | |
| पश्चिम बंगाल | | | | |
| अंदमान आणि निकोबार | | | | |
| अरुणाचल प्रदेश | | | | |
| चंदीगड | | | | |
| दादरा आणि नगर हवेली | | | | |
| गोवा | | | | |
| मिझोराम | | | | |
| पाँडिचेरी | | | | |
| लक्ष्यद्वीप | | | | |
| दमन आणि दीव | | | | |
| दिल्ली | | | | |
| छत्तीसगड | | | | |
| झारखंड | | | | |
| उत्तरांचल | | | | |
| | | | | |
| एकूण | | | | |

**योजनेची - सूची १**

**राज्यनिहाय सफाई कामगारांची संख्या व सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालय, एन.एस.के.एफ.डी.सी. इत्यादींनी पुनर्वसन केलेल्या कामगारांची संख्या व पुनर्वसन करण्याचे बाकी असल्याला सफाई कामगारांची संख्या याचा अहवाल.**

| क्रमांक | राज्याचे नाव | सफाई कामगारांची संख्या | वाढलेले कामगार (पुनः सर्वेक्षण घेतल्यानंतर) | एकूण | एकूण पुनर्वसन केलेले सफाई कामगार | पात्र असे पण पुनर्वसन करण्याचे बाकी असलेले सफाई कामगार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | आंध्रप्रदेश | ३०९२१ | १४९०१ | ४५८२२ | ४५८२२ | ० |
| २ | आसाम | ४०४१३ | | ४०४१३ | १५९४ | ३८८१९ |
| ३ | बिहार | १२२२६ | | १२२२६ | २८५ | ११९४१ |
| ४ | दिल्ली | १७४२० | | १७४२० | २९४१ | १४४७९ |
| ५ | गुजरात | ६४१९५ | | ६४१९५ | ११६५३ | ५२५४२ |
| ६ | हरियाणा | ३६३६२ | | ३६३६२ | १५५५८ | २०८०४ |
| ७ | हिमाचल प्रदेश | ४७५७ | | ४७५७ | २०२३ | २७३४ |
| ८ | जम्मु आणि काश्मिर | ४१५० | | ४१५० | २११ | ३९३९ |
| ९ | कर्नटक | १४५५५ | | १४५५५ | १२५९७ | १९५८ |
| १० | केरळ | १३३९ | | १३३९ | १४१ | ११९८ |
| ११ | मध्यप्रदेश | ८००७२ | १२३५ | ८१३०७ | ७७५१२ | ३७९५ |
| १२ | महाराष्ट्र | ६४७८५ | | ६४७८५ | १९०८६ | ४५६९९ |
| १३ | मेघालय | ६०७ | | ६०७ | ० | ६०७ |
| १४ | नागालँड | १८०० | | १८०० | ० | १८०० |
| १५ | ओडिसा | ३५०४९ | | ३५०४९ | १०६८१ | २४३६८ |
| १६ | पाँडिचेरी | ४७६ | | ४७६ | १२९ | ३४७ |
| १७ | पंजाब | ५३१ | २४५७ | २९८८ | २९८८ | ० |
| १८ | राजस्थान | ५७७३६ | | ५७७३६ | १४१६९ | ४३५६७ |
| १९ | तमिळनाडू | ३५५६१ | | ३५५६१ | २३६८७ | ११८७४ |
| २० | उत्तरप्रदेश | १४९२०२ | ६४७७३ | २१३९७५ | १८०७१९ | ३३२५६ |
| २१ | पश्चिम बंगाल | २३८५२ | | २३८५२ | २३३८ | २१५१४ |
| २२ | छत्तीसगड | | ३२४३ | ३२४३ | ३२४३ | ० |
| २३ | झारखंड | | ५७५० | ५७५० | ० | ५७५० |
| २४ | उत्तरांचल | | १९७० | १९७० | ४९३ | १४७७ |
| | **एकूण** | **६७६०००९** | **९४३२९** | **७७०३३८** | **४२७८७०** | **३४२४६८** |

## योजनेची सूची क्रमांक २

**उरलेल्या सफाई कामगारांचे (३४२४६८) पुनर्वसन करण्यासाठी आवश्यक असलेल्या पैशांचा अहवाल.**

**गृहितक** :

| | |
|---|---|
| एन.एस.के.एफ.डी.सी. च्या अनुभवावरुन | **सफाई कामगार** |
| १. २५% सफाई कामगार सूक्ष्म पत पुरवठा घेण्याचा पर्याय निवडतील (रुपये २५,०००/- पर्यंत | = ८५६१७ |
| २. ४०% सफाई कामगार मुदत कर्ज योजना घेण्याचा पर्याय निवडतील (रुपये २५,००१ ते रुपये ५००००) | = १३६९८७ |
| ३. ३५% सफाई कामगार मुदत कर्ज योजना घेण्याचा पर्याय निवडतील (रुपये ५०००१ ते रुपये ५०००००) | = ११९८६४ |
| **एकूण** | = **३४२४६८** |

४. एकूण योजनेचा खर्च

अ) सूक्ष्म वित्त योजनेखालीप्रकल्पाचा खर्च रुपये २५,०००/-

ब) रुपये २५,००१/- ते रुपये ५०,०००/- या खर्चाच्या प्रकल्पासाठी सरासरीच्या आधारे प्रत्येक प्रकल्पाचा खर्च रुपये ३७,५००/- धरला आहे.

क) रुपये ५०,००१/- ते रुपये ५,००,०००/- च्या खर्चाच्या प्रकल्पाचे सरासरीच्या आधारे प्रत्येक प्रकल्पाचा खर्च रुपये ६२,५००/- धरला आहे.

५. कर्ज व भांडवली मुदत खालीलप्रमाणे दिली आहे.

(रुपये कोटी मध्ये)

| क्रमांक | प्रकल्पाची किंमत | रुपये २५,०००/- | रुपये २५००१/- ते ५००००/- | रुपये ५०,००१/- ते ५,००,०००/- | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | **प्रकल्पाचे गुणोत्तर** | २५% | ४०% | ३५% | |
| १. | सफाई कामगार | ८५६१७ | १३६९८७ | ११९८६४ | **३४२४.६८** |
| २. | सफाई कामगारांची संख्या, कर्जाची रक्कम (बँकांकडून व्यवस्था करणे) | १०७.०२ | ३४२.४६ | ५६१.८६ | **१०११.३४** |
| ३. | मुदत | १०७.०२ | १७१.२३ | १८७.३० | **४६५.५५** |
| ४. | एकूण २ + ३ | २१४.०४ | ५१३.६९ | ७४९.१६ | **१४७६.८९** |

६. **एकूण आवश्यकता**

| तपशील | रक्कम |
|---|---|
| भांडवली मुदत | ४६५.५५ |

<table>
<tr><td>प्रशिक्षण<br>प्रत्येक लाभार्थीमागे<br>
<table>
<tr><td>(१)</td><td>प्रशिक्षण शुल्क</td><td>रु. ६,०००</td></tr>
<tr><td>(२)</td><td>टूल किट इत्यादी</td><td>रु. २,०००</td></tr>
<tr><td>(३)</td><td>प्रशिक्षणासाठी लागणारे सामान</td><td>रु. ६,०००</td></tr>
<tr><td></td><td></td><td>रु. १४,०००</td></tr>
</table>
सरासरीच्या आधारे रुपये १४,०००/-<br>एकूण लाभार्थी (४०%पैकी ३,४२,४६८ इतकी एन.एस.एल.आर.एस.<br>अनुभवी<br>१,२६,९८७ X रु. १४,००० = रु. १९१.७८ कोटी</td><td>१९१.७८</td></tr>
<tr><td>देखरेख व मूल्यांकन (खर्चाच्या १%)</td><td>७.३५</td></tr>
<tr><td>सहायता निधी</td><td>५.००</td></tr>
<tr><td>प्रसिद्धी व जागृती शिबीर</td><td>रु. २.२५</td></tr>
<tr><td>सहायता निधी</td><td>५.००</td></tr>
<tr><td>व्याज मदत</td><td>६३.४०</td></tr>
<tr><td>एकूण</td><td>७३५.६०</td></tr>
</table>

रक्कम - वरील अंदाज सरासरीच्या आधारे काढले आहेत व प्रत्येक प्रकल्पाला प्रशिक्षण शुल्क, प्रशिक्षण वर्गाच्या कालावधी, घेतलेले कर्ज इत्यादी नुसार बदलू शकते.

सूची ३

**सफाई कामगार पुनर्वसनासाठीच्या स्वयंरोजगार योजनेची अंमलबजावणी संस्थांचा तपशील.**

| **अनुक्रमांक** | **इतर संस्थांचे नाव आणि पत्ते** | **राष्ट्रीय अनुसूचीत जाती विकास निगम (एस.सी.डी.सी.)** | |
|---|---|---|---|
| | | **अनुक्रमांक** | **पत्ते** |
| १. | अध्यक्ष व प्रबंध निदेशक<br>राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास निगम<br>१४वा मजला, स्कोप मिनार, कोरे १ आणि २, नॉर्थ टॉवर, लक्ष्मी नगर जिल्हा केंद्र, लक्ष्मी नगर, दिल्ली - ११००९२ | १. | प्रबंध निदेशक<br>आसाम राज्य विकास निगम अनुसूचित जाती लि.,<br>शाहीद दिलीप होझोरी पथ, सारुनोतोरिया, दिसपुर, गुवाहाटी - ७८१०००६ |
| | | २. | प्रबंध निदेशक<br>बिहार राज्य अनुसूचित जाती विकास निगम को. लि.,<br>माल्या निल भवन, बुध्दा कॉलनी, पटना - ८०० ००१. |
| | | ३. | प्रबंध निदेशक<br>छत्तीसगड राज्य को-ऑप अनुसूचित जाती वित्त व विकास निगम लि.,<br>६८, जल विहार कॉलनी रायपुर (छत्तीसगड) |
| | | ४. | प्रबंध निदेशक<br>हरियाणा अनुसूचित जाती व वित्त विकास निगम लि.,<br>एससीओ क्र. २४७७-२८, सेक्टर-२२ |
| | | ५. | प्रबंध निदेशक<br>हिमाचल प्रदेश अनुसूचित जाती व जमाती विकास निगम लि.,<br>जैन भवन हॉस्पिटल रोड, सोलान - १७३२१२ |
| | | ६. | प्रबंध निदेशक<br>केरळ राज्य विकास निगम अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती लि.,<br>टाऊन हॉल रोड, त्रिचुर - ६८००२० |
| | | ७. | एक्सल्युजिव्ह निदेशक<br>पंजाब अनुसूचित जाती जमीन विकास निगम लि.,<br>एससीओ क्र. १०१-१०३, सेक्टर १७ - सी चंदीगड - १६० ०१७ |
| | | ८. | प्रबंध निदेशक<br>पश्चिम बंगाल अनुसूचित जाती व जमाती वित्त व विकास निगम लि.,<br>२ रा मजला, १३५ए, बिप्लाबी रासबिहारी बासु रोड, कोलकाता - ७०० ००१ |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रबंध निदेशक<br>राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास निगम<br>बी-२ पहिला मजला, स्कोप मिनार, कोरे १ आणि २, ग्रेटर कैलाश इनक्लेव्ह - २, नवी दिल्ली. | अनुक्रमांक | पत्ते |
| | | १. | प्रबंध निदेशक<br>ए. पी. अनुसूचित जाती वित्त व विकास निगम को-ऑप लि., ५वा मजला, तेलुगू समकशेमा भवन मासाब टँक हैद्राबाद- ५०००२८ |
| | | २. | प्रबंध निदेशक<br>गुजरात सफाई कामगार विकास निगम<br>ब्लॉक नं. ३, जी.एफ., डॉ. जीवराज मेहता भवन, गांधीनगर - ३८२०१० |
| | | ३. | प्रबंध निदेशक<br>कर्नाटक अनुसूचित जाती व जमाती विकास निगम लि.,<br>९वा आणि १० मजला,<br>विश्वेश्वराह मिनी टॉवर, डॉ. आंबेडकर विधी, बंगलोर - ५६०००१ |
| | | ४. | प्रबंध निदेशक<br>मध्यप्रदेश राज्य ४ कॉ-ऑप अनुसूचित जाती वित्त व विकास निगम,<br>राजीव गांधी नगर, ३५, श्यामला हिल्स, भोपाळ - ४६२००२ |
| | | ५. | प्रबंध निदेशक<br>महात्मा फुले अनुसूचित जाती विकास निगम लि., सुप्रिम शॉपिंग सेंटर, गुलमोहर क्रॉस रोड क्र. ९,<br>जे.व्ही.पी.डी. स्कीम, जुहू, मुंबई - ४०००४९ |
| | | ६. | प्रबंध निदेशक<br>ओडिसा अनुसूचित जाती व जमाती वित्त व विकास निगम लि.,<br>लुईस रोड, भुवनेश्वर - ७५१०१४ |
| | | ७. | प्रबंध निदेशक<br>पुद्दूचेरी ॲडी द्राविदर विकास निगम लि.,<br>क्र. २३, व्ही. क्रॉस रोड, सिथनकुडी, पाँडिचेरी - ६०५०१३ |
| | | ८. | प्रबंध निदेशक<br>राजस्थान अनुसूचित जाती व जमाती विकास निगम लि.,<br>नेहरु शंकर भवन, सेंट्रल ब्लॉक, ३रा मजला, भवानी सिंग रोड, जयपुर - ३०२००२ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ९. | प्रबंध निदेशक<br>तमिळनाडू ॲडी द्राविदर हाऊसिग व विकास निगम लि.,<br>तमिळनाडू हाऊसिंग बोर्ड शॉपिंग कॉंप्लेक्स, २ रा मजला, तिरुमंगलम् (अण्णा नगर) चेन्नई - ६०० ०१० |
| | | १० | प्रबंध निदेशक<br>झारखंड राज्य एस.सी.<br>को-ऑप विकास निगम, बालिहर रोड, मोरताबादी, रांची - ८३४०४८ |
| | | ११. | प्रबंध निदेशक<br>मेघालय नागरी विकास एजन्सी,<br>रैतॉंग बिल्डींग, शिलॉंग - ७९३००१ |
| | | १२. | सचिव<br>सामाजिक वेलफेयर विभाग गव्हर्नमेंट ऑफ नागालॅंड<br>कोहिमा |
| ३. | प्रबंध निदेशक<br>राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास निगम<br>एन.सी.यु.आय. बिल्डींग, ऑगस्ट क्रांती मार्ग, हौझ खास, नवी दिल्ली | अनुक्रमांक | पत्ते |
| | | १. | प्रबंध निदेशक<br>जम्मु आणि काश्मिर अनुसूचित जाती विकास निगम<br>रोमेश मार्केट, शास्त्री नगर, जम्मु - १८०००४ |
| | | २. | प्रबंध निदेशक<br>उत्तर प्रदेश अनुसूचित जाती व वित्त विकास निगम लि.,<br>बी-१९२, सेक्टर-सी, महानगर,<br>लखनऊ - २२६००६ |
| | | ३. | प्रबंध निदेशक<br>बहु उदास्य विटा अवाम विकास निगम<br>सेक्टर - १-सी-१०, डिफेन्स कॉलनी, देहरादुन (उत्तरांचल) |
| ४. | अध्यक्ष व प्रबंध निदेशक<br>राष्ट्रीय अपंग वित्त व विकास निगम<br>रेड क्रॉस भवन, मिनी सेक्टरच्या समोर, सेक्टर १२,<br>फरिदाबाद - १२७००७ | अनुक्रमांक | पत्ते |
| | | १. | प्रबंध निदेशक,<br>दिल्ली अनुसूचित जाती व वित्त विकास निगम<br>आंबेडकर भवन, इन्स्टीट्युशनल एरियाज, सेक्टर १६ रोहिणी, दिल्ली |

परिशिष्ट ४

ह्या महापरिपत्रकात एकत्रित केलेल्या महापरिपत्रकांची यादी

| क्रमांक | परिपत्रक क्रमांक | दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| १ | आरपीसीडी एसपी क्र ५७/०९.०३०१/ ०७/०८ | १५.४.२००८ | नवीन योजना कचरा सफाई करणाऱ्या लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी स्वयंरोजगार योजना |
| २ | आरपीसीडी एसपी ३६/०९.०३.०१/०८.०९ | १९.९.२००८ | एसआरएमएस ठरविलेल्या लक्ष्याची साध्यता |
| ३ | आरपीसीडी एसपी ११७/०९.०३.०१/०८-०९ | २९.६.२००९ | एसआरएमएस योजना सप्टेंबर २००९ पर्यंत वाढविण्यात आली. |
| ४ | आरपीसीडी एसपी क्र ४७/०९.०३.०१//०९-१० | १८.१२.२००९ | स्कीम फॉर रिहॅबिलिटेशन ऑफ मॅन्युअल स्कॅव्हेंजर्स सप्टेंबर २००९ च्या पलिकडे वाढविण्यात आली. |